# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक लोकशाही

**डॉ. अवधूत बाबासो टिपूगडे**
शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय,
कराड.

**सारांश:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लोकशाही विचारांचे पुरस्कर्ते होते. त्यांची लोकशाही या विचारसरणीवर निष्ठा असलेले दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण इंग्लंड व अमेरिका या देशात झाल्यामुळे तेथील लोकशाही व्यवस्थेचा त्यांच्यावर प्रभाव होता. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी सुद्धा त्यांनी लोकशाहीसाठी इंग्लंडला पाठिंबा दिलेला दिसून येतो. लोकशाहीमध्ये अध्यक्ष लोकशाही व संसदीय लोकशाही मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर संसदीय लोकशाहीचा स्वीकार करताना दिसून येतात. डॉ.आंबेडकर यांच्या मते, भारतातील दुर्बल घटकांच्या प्रश्न मुख्य तो आर्थिक नसून तो प्रामुख्याने सांस्कृतिक घटकांशी निगडित असलेला आहे म्हणून त्यांनी लोकशाही पद्धत तिचा विचार लाभलेला किंवा तत्व सांगणारा धर्म म्हणून बौद्ध धर्म स्वीकारलेला दिसतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात जिच्याद्वारे रक्तपाता शिवाय मुलगामी क्रांतिकारक बदल घडवून आणता येतात अशा शासनाचे घटना किंवा पद्धती म्हणजे लोकशाही होय. स्त्री–पुरुष ,श्रीमंत –गरीब, स्पृश्य अस्पृश्य ,असा भेदभाव न मानता प्रत्येक व्यक्तीला विकासाच्या सर्व संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत, प्रत्येकाला समान स्वातंर्त्य असले पाहिजे, सामाजिक न्यायाची उभारणी झाली पाहिजे, या सर्वांसाठी लोकशाही पद्धत महत्त्वाची आहे असे डॉ.आंबेडकरांना वाटत होते.

**पारिभाषिक शब्द:** लोकशाही, सामाजिक लोकशाही, बौद्ध धर्माची तत्त्वे, संविधान

**प्रस्तावना –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्य प्रदेशातील महू या गावी झाला. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, लोकशाहीचे पुरस्कर्ते, सामाजिक चळवळीचे एक प्रणेते आणि मानवी स्वातंर्त्याचे उद्गाते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य हे अलौकिक असलेले दिसते. समाजकारण, राजकारण, अर्थकारण, धर्म, शिक्षण, राज्यघटना अशा विविध विषय व घटकावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले कार्य अभ्यासपूर्ण कार्य हे भारतीय जनतेला समाजाला दिशादर्शक ठरलेले व ठरताना दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लोकशाही विचारांचे पुरस्कर्ते होते. त्यांची लोकशाही या विचारसरणीवर निष्ठा असलेले दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण इंग्लंड व अमेरिका या देशात झाल्यामुळे तेथील लोकशाही व्यवस्थेचा त्यांच्यावर प्रभाव होता. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी सुद्धा त्यांनी लोकशाहीसाठी इंग्लंडला पाठिंबा दिलेला दिसून येतो. लोकशाहीमध्ये अध्यक्ष लोकशाही व संसदीय लोकशाही मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर संसदीय लोकशाहीचा स्वीकार करताना दिसून येतात. डॉ.आंबेडकर यांच्या मते, भारतातील दुर्बल घटकांच्या प्रश्न मुख्य तो आर्थिक नसून तो प्रामुख्याने सांस्कृतिक घटकांशी निगडित असलेला आहे म्हणून त्यांनी लोकशाही पद्धत तिचा विचार लाभलेला किंवा तत्व सांगणारा धर्म म्हणून बौद्ध धर्म स्वीकारलेला दिसतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात जिच्याद्वारे रक्तपाता शिवाय मुलगामी क्रांतिकारक बदल घडवून आणता येतात अशा शासनाचे घटना किंवा पद्धती म्हणजे लोकशाही होय.

स्त्री–पुरुष ,श्रीमंत –गरीब, स्पृश्य अस्पृश्य ,असा भेदभाव न मानता प्रत्येक व्यक्तीला विकासाच्या सर्व संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत, प्रत्येकाला समान स्वातंर्त्य असले पाहिजे, सामाजिक न्यायाची उभारणी झाली पाहिजे, या सर्वांसाठी लोकशाही पद्धत महत्त्वाची आहे असे डॉ.आंबेडकरांना वाटत होते.

सदर संशोधन निबंधाचा शीर्षकावरून आपणास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक लोकशाही संदर्भात विचार कोणते होते हे समजून घ्यावे लागेल म्हणून सदर संशोधन निबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे सामाजिक लोकशाही संदर्भातील विचारांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधनाचे उद्दिष्टे –**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाही संकल्पना अभ्यासणे.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक लोकशाही संदर्भातील विचार समजून घेणे.

**विषयाची मांडणी** –

सध्या कालीन परिस्थितीत आपण ज्या राजकीय सामाजिक आणि आर्थिक स्थितीतून पुढे जात आहोत त्या स्थितीचा विचार करता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाही या संकल्पनेतील काही आशय आपण गमावत आहोत असा प्रत्यय येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतामध्ये राजकीय लोकशाहीतून सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित करायची होती म्हणूनच ते राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत परिवर्तन व्हावे यासाठी आग्रही होते. म्हणजेच लोकशाही प्रणालीतून त्यांना या देशातील लोकांच्या जीवनात सामाजिक व आर्थिक स्तरांमध्ये अमुलाग्र परिवर्तन घडवून आणायचे होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशाही संकल्पनेचे विश्लेषण करताना असे म्हणतात की ज्या शासन पद्धतीमुळे सत्तारूढ मंडळींना सामाजिक व आर्थिक क्षेत्रात मूलभूत बदल करता येतात आणि असे बदल ग्रहण करताना जनता हिंसात्मक मार्गाचा अवलंब करीत नाही तेथेच लोकशाही नांदते असे मी म्हणेन.

वरील विश्लेषणासंदर्भावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाहीची संकल्पना समजून येते.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक लोकशाही संदर्भातील विचार –**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, सामाजिक लोकशाही यशस्वी करावयाची असेल तर समाज व्यवस्थेत आढळणारी विषमता नष्ट केली पाहिजे. समाजातील जातीव्यवस्था वर्ग व्यवस्था या लोकशाहीस मारक आहेत सर्व व्यक्तींना कायद्यासमोर समान मानले पाहिजे लोकशाही यशस्वी होण्यासाठी समतेची नितांत आवश्यकता आहे असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते.

२. लोकशाहीमध्ये विरोधी पक्ष हा घटक खूपच महत्त्वाचा आहे. आधुनिक काळात सत्ताधारी पक्षावर नियंत्रण ठेवण्यासाठी विरोधी पक्ष आवश्यक आहे. दर पाच वर्षांनी निवडणुका होत असतात.दरम्यानच्या काळात सत्तारूढ पक्षाच्या कार्यावर अंकुश ठेवणारा विरोधी पक्ष असणे आवश्यक आहे. विरोधी पक्षामुळे सत्ताधारी सरकारचे असणारे चुकीचे ध्येय धोरणे एरणीवर ठेवून ती नीटनेटकी करण्याची एक व्यवस्था बनते.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, लोकशाही यशस्वी करण्यासाठी कायदेशीर व प्रशासकीय समता प्रस्थापित होणे गरजेचे आहे.कायद्याचे अधिराज्य मान्य करून प्रशासकीय अधिका्रयांनी सर्वांना समतेची वागणूक दिली पाहिजे तर सर्वांना समान न्याय प्रस्थापित होईल.

४. संविधानात्मक नीतिमत्ता ही लोकशाहीच्या यशस्वीतेची आणखी एक पायरी आहे. भारतीय घटनेत दुरुस्त्या करणे किंवा संबंध घटनेचे उच्चाटन करणे ही बाब आक्षेपार्य नाही पण घटनेचे मूळ संविधानात्मक मूल्य अबाधित राहायला हवे असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा कटाक्ष आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय राज्यघटने कडे बोट करून ते म्हणतात की आपली आजची घटना ही कायदेशीर तरतुदींच्या व तत्वांचा नुसता सांगाडा आहे. या सांगाड्यातला आवश्यक असलेली रक्तमास संविधानात्मक नीतिमत्तेच्या पालनातच मिळेल म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधानिक नीतिमत्तेची अपेक्षा करतात.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राजकारण व नीतिमत्ता यांचा संबंध अपरिहार्य आहे असे मानतात. राजकारण आणि नीतिमत्ता या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत त्यांची परस्परांशी फारकत करणे म्हणजे लोकशाहीच्या निरोगीपणास बाधा आणणे सारखे आहे असे ते म्हणत. विवेकी लोकमत हे त्याचेच महत्त्वाचे अंग आहे. सार्वजनिक लोकमत न्याय आणि अन्याय यांची निर्णय शक्ती असते. जिच्या प्रादुर्भावामुळे प्रत्येक व्यक्ती अन्याय परिमार्जनार्थ पीडितांना सहाय्यक ठरते तेथे सार्वजनिक विवेक बुद्धीचा उदय होतो.

६. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी अल्पसंख्याकांच्या संरक्षणाचा प्रश्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना तितकाच महत्त्वाचा वाटतो लोकशाहीच्या नावाखाली अल्पसंख्याकांची बहुसंख्यांकडून गळचेपी होता कामा नये. यावर त्यांचा कटाक्ष आहे. लोकशाहीत अल्पसंख्यांकांना आपल्या संरक्षणाची व हक्कांची हमे मिळायला हवे असे घडले नाही तर त्यांच्यात असुरक्षिततेची भावना वाढीला लागेल.

राजकीय लोकशाही सामाजिक लोकशाही शिवाय अपूर्ण आहे. हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सिद्धांत सर्वश्रुत आहे सत्ताधारी पक्षाने राजकीय लोकशाहीतून सामाजिक लोकशाही निर्माण करण्यासाठी झटले पाहिजे. सामाजिक लोकशाही म्हणजे स्वातंत्र्य समता आणि बंधुत्व हे प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्याची जीवनसत्वे असल्याचे दिसते. न्यायमूल्य हे समग्र जीवनाचे मूलसूत्र मानणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर राजकीय लोकशाहीच्या भवितव्यतेचा वेध घेताना दिसून येतात.

**संशोधनाचे निष्कर्ष –**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही संकल्पना ही जगातील सर्वच राष्ट्रांच्या विकासासाठी उपयुक्त असलेले दिसून येते.
2. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाही संकल्पने मध्ये व्यक्ती विकासास चालना मिळताना दिसून येते.
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक लोकशाही संदर्भात विचार व्यक्त करताना असे म्हणतात की समाजातील विषमता नष्ट केली पाहिजे सर्व व्यक्तींना कायद्यापुढे समान वागणूक दिली पाहिजे.
4. सामाजिक लोकशाहीसाठी सत्ताधारी पक्षावर वचक ठेवण्या संदर्भात विरोधी पक्ष हा सक्षम असला पाहिजे.
5. सामाजिक लोकशाही यशस्वी करण्यासाठी आपण संविधानिक नीतिमत्ता महत्वाचे आहे.

अशाप्रकारे आपणास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक लोकशाही संदर्भात विचार हे मौलिक संदेश देणारे ठरतात व जगातील प्रत्येक राष्ट्राला मार्गदर्शक ठरताना दिसून येतात असे म्हणावे लागेल.

**संदर्भ –**

1. व्होरा राजेंद्र, पळशीकर सुहास, भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. २०१९
2. पाटील वा.भा., आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.२००९.
3. दैनिक महाराष्ट्र टाइम्स मधील लेख.
4. दैनिक लोकमत मधील लेख.